| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्र पोलीस | | **चोपडा ग्रामीण पोलीस स्टेशन**<br>जावक क्रमांक /2025<br>फोन नं. 02586 - 222101<br>Email -chopdarural@gmail.Com<br>दिनांक 24/07/2025 |

# प्रेस नोट

## चोपडा ग्रामिण पोलीस स्टेशन यांची दमदार कामगिरी, ०४ गावठी कट्टे (अग्नीशस्त्र) व ८ जिवंत काडतुस वाहतुक करीत असतांना पुणे व धाराशिव जिल्ह्यातील दोन आरोपी जेरबंद

पारउमर्टी ता वरला जि.बडवाणी (मध्य प्रदेश) या गावाची सीमा महाराष्ट्र राज्याच्या चोपडा तालुक्यातील उमर्टी या गावाला लागुन आहे.पारउमर्टी येथे शिकलकर समाजाचे लोक राहत असुन ते पुर्वीपासुन अवैध अग्निशस्त्र व दारुगोळा बनवुन विक्री करीत असतात.त्यांच्या गैकृत्यास आळा बसावा याकरीता मागील एक महीन्यापासुन मा.पोलीस अधिक्षक सो जळगाव मा.डॉ महेश्वर रेड्डी, मा. अपर पोलीस अधिक्षक चाळीसगांव, कविता नेरकर मॅडम, मा. पोलीस उपअधिक्षक चोपडा उपविभाग , श्री आण्णासाहेब घोलप, यांच्या संकल्पनेतुन उमर्टी व सत्रासेन परिसरात २४बाय ०७ अशी नाकाबंदी लावण्यात आली आहे.

दिनांक २३/०७/२०२५ रोजी सत्रासेन नाका येथे नाकाबंदी ड्युटीस असलेले पोकॉ/९२७ रावसाहेब एकनाथ पाटील,पोकॉ/७७५ घनश्याम हिम्मत पाटील यांना उमर्टी नाक्याकडुन सत्रासेन बाजुकडे एक मोटर सायकल वेगात येतांना दिसली.त्यांनी त्वरीत बॅरीकेट लावले असता मोटर सायकल चालकाने मोटर सायकल वळवुन पळ काढण्याचा प्रयत्न केला असता पोकॉ रावसाहेब पाटील यांनी शिताफिने पकडले असता ते मोटर सायकलसह खाली पडले. त्यावेळी त्यांच्यापैकी मोटर सायकल चालविणाऱ्या इसम नामे मंथन मोहन गायकवाड वय २२ वर्ष मुळरा.वडाळा ता.वार्शी जि.सोलापुर ह.मु. हडपसर मांजरी रोड टकले कॉलनी नं.१ गोपाळपट्टी मांजरी बु।। पुणे जि.पुणे याच्या बॅगेत ०३ अग्निशस्त्र व ०६ जिवंत काडतुसे तसेच मागे बसलेल्या इसम नामे स्वप्निल बिभीषण कोकाटे वय ३२ वर्ष मुळरा.रुई ता.वाशी जि.धाराशिव याच्या कब्जात ०१ पिस्टल व ०२ जिवंत काडतुसे मिळुन आली.सदर घटना पोकॉ रावसाहेब पाटील यांनी कळविल्यानंतर .पो.नि अनिल भवारी,श्रेणी पोउपनि बापु साळुंके,पोकॉ/१२५६ चेतन महाजन,पोकॉ/१२१३ विशाल पाटील,व इतर यांनी पकडुन ठेवलेल्या वरील अग्निशस्त्र जवळ बाळगणा-या इसमांजवळ पोहोचुन पंचानाम्याद्वारे अग्निशस्त्र व काडतुसे जप्त केली.

अटक आरोपी मंथन मोहन गायकवाड व स्वप्निल बिभीषण कोकाटे यांचेकडेस चौकशी करता अटक आरोपी यांनी त्याचे साथीदार आप्पासाहेब गायकवाड रा.गोजवड ता.वाशी जि.धाराशिव, कानीफनाथ बहीरट दोन्ही रा. बाबा पेट्रोल पंप जवळ संभाजीनगर हे त्यांचे सोबत असलेबाबत व ते धुळे येथे थांबलेले आहेत बाबत सांगीतल्याने त्यांचा धुळे येथे जावून शोध घेतला असता ते मिळून आले नाहीत. त्यांनी अग्नीशस्त्र उमर्टी येथुन आणण्यासाठी कानिफनाथ बहीरट याचे मित्राची मोटार सायकल धुळे येथून देवुन मदत केली होती आणि ते स्वत धुळे येथे चारचाकी गाडी घेवुन थांबले होते. अटक आरोपी हे अग्नीशस्त्र घेवुन फरार आरोपी यांना चारचाकी गाडीतुन सुरक्षीत वाहतुक करण्यासाठी ताब्यात देणार होते अशी माहीती दिली त्याचप्रमाणे अटक आरोपी यांनी उमर्टी येथील शिकलकर टोपन नाव (पाजी) याने सदरची अग्निशस्त्र व काडतुसे ५०,०००/- रुपयात विक्री केल्याचे सांगीतले. अटक आरोपीपैकी मंथन गायकवाड याच्यावर अग्निशस्त्र विक्रीते गुन्हे दाखल असुन सदरचे अग्निशस्त्र आरोपी कोणास विक्री करणार होते याचा शोध पोलीस घेत आहेत.




लोकमत
गडचिरोलीत विकासविरोधी कारवायांना विदेशातून फंडिंग!
नवे उपराष्ट्रपती निवडताना भाजपला नाही चिंता; ४२२ सदस्यांचे समर्थन; बहुमताने एकच उमेदवार
७/११ बॉम्बस्फोटाच्या निकालाविरोधात सरकार सुप्रीम कोर्टात; गुरुवारी सुनावणी
देशातील ८० टक्के गावे झाली हागणदारीमुक्त
मुक्ताईनगरातील शेतकरी जमिनीच्या मोबदल्यासाठी पेटले
जम्मू-काश्मीर, हिमाचलमध्ये भूस्खलनात ५ जणांचा मृत्यू
नवीन
POWERWASH
Fena
खोलवर स्वच्छता, खोलवर सुगंध
फेनाच घ्याना
जुने ते सोने
हर बाइट में मजा
No.1